मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर
<u>यांच्या आदेशानुसार पदस्थापनेमध्ये सुधारणा करणेबाबत.</u>
डॉ.प्रिती आर.शिरसाठ, पशुधन विकास अधिकारी .

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन आदेश क्रमांक पसंप्र-२०१७/प्र.क्र.२४२/पदुम-१
५ वा मजला विस्तार, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :-२९ नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा</u> :- शासन आदेश क्र.पसंप्र-२०१६/प्र.क्र.३४५/दि.३१.०५.२०१७.

<u>शासन आदेश</u> :-

डॉ.प्रिती आर.शिरसाठ, पशुधन विकास अधिकारी यांनी त्यांच्या बदलीसंदर्भात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेला मुळ अर्ज क्र.७७४/२०१७ मध्ये मा. न्यायाधिकरणाने दि. ११.१०.२०१७ रोजी न्यायनिर्णय पारित करुन डॉ.शिरसाठ यांनी शासनाकडे दिलेल्या निवेदनावर दोन महिन्यामध्ये निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत. मा.न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार डॉ.प्रिती शिरसाठ यांच्या निवेदनाचा शासन स्तरावर विचार करण्यात आला असून विचारांती, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतूदी नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजूरीने डॉ.प्रिती आर.शिरसाठ, पशुधन विकास अधिकारी(गट-अ) यांच्या बदलीबाबत दि.३१.५.२०१७ च्या शासन आदेशामध्ये अंशत: बदल करुन आता त्यांची सुधारीत पदस्थापना खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ मध्ये नमूद ठिकाणी करण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नांव	मा.न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार सुधारीत पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३
१.	डॉ. प्रिती आर.शिरसाठ, पशुधन विकास अधिकारी, तालपसचि, तिरोडा, जि. गोदिया	पशुधन विकास अधिकारी, पवैद श्रेणी-१, कामठी, ता. कामठी, जि. नागपूर. (रिक्त पदावर)

२. संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी पर्यायी व्यवस्था करुन डॉ.शिरसाठ यांना कार्यरत पदावरुन तातडीने कार्यमुक्त करावे. तसेच डॉ.प्रिती शिरसाठ यांनी वरीलप्रमाणे पदस्थापनेच्या पदावर विनाविलंब रुजू व्हावे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१७११२९११०६२९३५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vinod Sopanrao Mendhe

Digitally signed by Vinod Sopanrao Mendhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3dfd984bb7c5aede090473e34b1c93fa9f36d97d56c0cf07812a43c5ca5d6a24, cn=Vinod Sopanrao Mendhe
Date: 2017.11.29 11:09:15 +05'30'

(वि.सो.मेंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-०७.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया/नागपूर

३. सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) पुणे.
४. मुख्य सादरकर्ता अधिकारी, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ नागपूर.
५. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर
६. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, गोंदिया/नागपूर
७. जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया/नागपूर
८. संबंधित पशुधन विकास अधिकारी द्वारा आयुक्त पशुसंवर्धन, म.रा.पुणे.
९. निवड नस्ती.